## प्रेस नोट

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,बुलढाणा
दि.१६.०४.२०२५

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बुलढाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे श्री.अनिल विठठल कुकडे, वय ४५ वर्ष, पद पोहेकॉ/ब.नं.६५४ पोलीस स्टेशन बुलढाणा शहर जि.बुलढाणा |
| लाच मागणी | २०,०००/— रुपये तडजोडी अंती १५,०००/— रुपये |
| लाच स्विकारली | पैकी आज रोजी ५०००/—रू.स्विकारले |
| घटनास्थळ | दवे टी सेंटर,कारंजा चौक,बुलढाणा |
| घटना तारीख | १६.०४.२०२५ |

**थोडक्यात हकीकत :—** यातील तक्रारदार यांनी त्यांची फसवणूक झाल्याबाबतचा तक्रार अर्ज पोलीस अधिक्षक, कार्यालय,बुलढाणा येथे केला होता. सदर अर्ज पुढील चौकशी कामी पोलीस स्टेशन बुलढाणा शहर येथे प्राप्त होता. सदर अर्जाचे चौकशी मध्ये गैरअर्जदार यांचेविरूध्द तक्रारदार यांचे तक्रारी प्रमाणे फसवणूकीचा गुन्हा दाखल करून कार्यवाही करण्यासाठी बिट जमादार पोहेकॉ कुकडे पोस्टे बुलढाणा शहर हे तक्रारदार यांना २०,०००/— रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार आज रोजी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,बुलढाणा घटकाकडे प्राप्त झाली होती.

त्यानुसार दिनांक १६.०४.२०२५ रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता, लोकसेवक बिट जमादार पोहेकॉ कुकडे,पोस्टे बुलढाणा शहर यांनी पंचा समक्ष तडजोडी अंती १५,०००/— रूपये लाचेची मागणी करून त्यापैकी आज रोजी सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचेकडून ५,०००/— रुपये स्विकारून लोकसेवक या नात्याने गैरमार्गाने कर्तव्य पार पाडल्याचा मोबदल्याच्या स्वरुपात स्वतःचा आर्थिक गैरलाभ करुन घेतला त्यावरून लोकसेवक यांना ताब्यात घेवुन त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन बुलढाणा शहर येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

**सदर कार्यवाही :—**

१.मा.श्री.मारुती जगताप,पोलीस अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती
२.मा.श्री.सचिंद्र शिंदे, अप्पर पोलीस अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, व सापळा पथक अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा, कार्यालय दुरध्वनी क्रमांक **०७२६२—२४२५४८** व **९६५७०६६४५५** तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी केले आहे.

**(श्रीमती शितल घोगरे)**
पोलीस उपअधिक्षक,
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा

पोलीस उप अधिक्षक,अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो सत्यमेव जयते * बुलढाणा *